RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष ४, अंक ५५] मंगळवार, मे ८, २०१८/वैशाख १८, शके १९४० [पृष्ठे ४, किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक १२२

### प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

### महसूल व वन विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, पहिला मजला, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ८ मे २०१८.

### अधिसूचना

**महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६.**

क्रमांक जमीन २०१८/प्र.क्र.०२/ज-१.—महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (१९६६ महा. ४१) च्या कलम ३२८, च्या पोट-कलम (१) आणि पोट-कलम (२) च्या खंड (चार),(दहा), (चौदा) आणि (त्रेसष्ठ) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा व त्याबाबत समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून "महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट करणे) नियम १९७१" यामध्ये सुधारणा करण्यासाठी जे नियम करण्याचे योजले आहे, त्या नियमांचा पुढील मसुदा उक्त संहितेच्या कलम ३२९, पोट-कलम (१) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे त्याद्वारे बाधा पोहचण्याचा संभव असलेल्या सर्व व्यक्तींच्या माहितीसाठी त्याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे आणि अशी नोटीस देण्यात येत आहे की, उक्त मसुदा दिनांक ८ जून २०१८ किंवा त्यानंतर महाराष्ट्र शासन विचारात घेईल.

२. महाराष्ट्र शासनाचे प्रधान सचिव, महसूल व वन विभाग, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, यांचेकडे वरील दिनांकापूर्वी उक्त मसुद्याच्या संबंधात कोणत्याही व्यक्तींकडून येणाऱ्या/प्राप्त होणाऱ्या हरकती व सूचना शासनाकडून विचारात घेण्यात येतील.

### नियमांचा मसुदा

१. या नियमांना, "महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट करणे) (द्वितीय सुधारणा) नियम २०१८" असे म्हणावे.

२. महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनींची विल्हेवाट करणे) नियम १९७१ चे कलम ३७ नंतर पुढीलप्रमाणे नियम समाविष्ट करण्यात येत आहे :—

"३७. अ. महानगरपालिका किंवा नगरपरिषद क्षेत्रातील भूखंडालगत असलेल्या घरांची बोळकांडी किंवा सफाई गल्ली (CONSERVANCY LANE)ची शासकीय किंवा नझूल जमीन, लगतचा भूखंडधारक ज्या धारणाधिकारावर उक्त भूखंड तो धारण

करीत असेल, त्याच धारणाधिकारावर जर तो पुढील रक्कम देण्यास मान्य करील, तर अशा जमिनीचे भोगवटामूल्य कितीही असले तरी जिल्हाधिकारी अशी जमीन लगतच्या भूखंड धारकास प्रदान करण्यास सक्षम राहतील :—

(*i*) जर लगतच्या भूखंड धारकाने, धारण केलेला भूखंड हा शासकीय किंवा नझूल जमीन असून, असा भूखंड संबंधितांनी भाडेपट्ट्याने धारण केलेला असल्यास, घराची बोळकांडी किंवा सफाई गल्ली (CONSERVANCY LANE) जमीन, लगतचा भूखंडधारक यांना शासनाच्या प्रचलित धोरणानुसार भाडेपट्ट्याची रक्कम आकारून आणि वसूल करुन भाडेपट्ट्याने प्रदान करण्यात येईल ; किंवा

(*ii*) जर लगतच्या भूखंड धारकाने, धारण केलेला भूखंड हा शासकीय किंवा नझूल जमीन असून, असा भूखंड संबंधितांनी कब्जेहक्काने धारण केलेला असल्यास, घराची बोळकांडी किंवा सफाई गल्ली (CONSERVANCY LANE)जमीन, लगतचा भूखंडधारक यांना शासनाच्या प्रचलित धोरणानुसार कब्जेहक्काची रक्कम आकारून आणि वसूल करुन भाडेपट्ट्याने प्रदान करण्यात येईल ; किंवा

(*iii*) जर लगतच्या भूखंड धारकाने, धारण केलेला भूखंड हा शासकीय किंवा नझूल जमीन असून, असा भूखंड संबंधितांनी भोगवटादार वर्ग-१ या धारणाधिकाराने धारण केलेला असल्यास, घराची बोळकांडी किंवा सफाई गल्ली (CONSERVANCY LANE) जमीन, लगतचा भूखंडधारक यांना शासनाच्या प्रचलित धोरणानुसार अशा प्रदानासाठीची देय रक्कम आकारून आणि वसूल करुन भोगवटादार वर्ग-१ या धारणाधिकाराने प्रदान करण्यात येईल ;

(*iv*) तसेच, उक्त नमूद (*i*) किंवा (*ii*) किंवा (*iii*) प्रमाणे वसूल केलेल्या रक्कमेशिवाय, ज्या दराने लगतचा भूखंडधारक अशा जागेसाठी आकारणी देत असेल, त्याच दराने अशा घराची बोळकांडी किंवा सफाई गल्लीतील जमिनीची आकारणी देय राहील."

**स्पष्टीकरण.**—या नियमांच्या प्रयोजनार्थ "घराची बोळकांडी" किंवा "सफाई गल्ली" या संज्ञा म्हणजे नाली म्हणून उपयोगात आणण्यासाठी किंवा संडास, मुत्री किंवा मलकुंड किंवा दुर्गंधियुक्त अगर प्रदुषित पदार्थासाठी ठेवलेले इतर पात्र याकडे जाण्यासाठी महानगरपालिकेच्या किंवा नगरपालिकेच्या कर्मचाऱ्यास किंवा ती साफ करण्यासाठी अगर त्यातील घाण काढून नेण्याकरीता नेमलेल्या व्यक्तीस जावू देण्यासाठी बांधलेला, अलग राखलेला किंवा उपयोगात आणलेला एखादा मार्ग किंवा जमिनीची पट्टी.

३. मुख्य नियमांच्या नियम ५० खालील, पहिल्या परंतुकानंतर पुढील परंतुक समाविष्ट करण्यात येईल :—

"परंतु आणखी असे की, नियम ३७ अ अन्वये शासकीय किंवा नझूल जमीन प्रदान करताना या नियमातील उक्त निर्बंध लागू राहणार नाहीत."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**राजेंद्र क्षीरसागर,**
शासनाचे सह सचिव.